दिपस्तंभ डॉ.बाबासाहेब आंबेडकर महिला शैक्षणिक संस्था, यवतमाळ संचलीत मातोश्री पार्वतीबाई निवासी अंध विद्यालय, भोसा, जि.यवतमाळ ही बंद पडलेली अंध प्रवर्गाची अनुदानित शाळा श्री.राष्ट्रसंत शिक्षण संस्कृती ज्ञानपीठ, मासोदा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती या संस्थेला हस्तांतर करुन मौजे कारंजा लाड, जि.वाशिम येथे स्थलांतरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : इडीडी २०१४/प्र.क्र.९७/अ.क.१
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : १५ जानेवारी, २०१६.

<u>वाचा</u> : १) शासन निर्णय सामाजिक न्याय विभाग क्र.ईडीडी २००१/प्र.क्र.५०२/सुधार-२, दि.१९.७.२००३ व समक्रमांकाच शासन पुरकपत्र दि.४.१२.२००३.
२) शासन निर्णय सामाजिक न्याय विभाग क्र.ईडीडी २०१३/प्र.क्र.३५०/अ.क.१, दि.२४.१.२०१४.
३) मा.मंत्री (सा.न्या.) यांच्यासमोर झालेल्या सुनावणीचे आदेश क्र.इडीडी २०१३/ प्र.क्र.३५८/अ.क.१, दि.१४.७.२०१४.
४) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचे क्र.अकआ/प्र-२/अंध/हस्तांतर स्थलांतर/२०१४-१५/४३, दि.८.१.२०१५ व दि.९.३.२०१५ चे पत्र.
५) शासन निर्णय क्र.इडीडी २०१३/प्र.क्र.३५८/अ.क.१, दि.१३ जानेवारी, २०१६.

<u>प्रस्तावना</u> :-

दिपस्तंभ डॉ.बाबासाहेब आंबेडकर महिला शैक्षणिक संस्था, यवतमाळ संचलीत मातोश्री पार्वतीबाई निवासी अंध विद्यालय, भोसा, जि.यवतमाळ ही बंद पडलेली अंध प्रवर्गाची अनुदानित शाळा श्री.राष्ट्रसंत शिक्षण संस्कृती ज्ञानपीठ, मासोदा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती या संस्थेला हस्तांतरीत करुन मौजे कारंजा लाड,जि.वाशिम येथे स्थलांतरीत करण्याबाबत प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

दिपस्तंभ डॉ.बाबासाहेब आंबेडकर महिला शैक्षणिक संस्था, यवतमाळ संचलीत मातोश्री पार्वतीबाई निवासी अंध विद्यालय, भोसा, जि.यवतमाळ ही बंद पडलेली अंध प्रवर्गाची विशेष अनुदानित शाळा मौजे कारंजा लाड, जि.वाशिम परिसरातील अंध प्रवर्गातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गैरसोय दूर व्हावी आणि सदर पंचक्रोशित सदरील शाळेची आवश्यकता असल्याची बाब विचारात घेऊन श्री.राष्ट्रसंत शिक्षण संस्कृती ज्ञानपीठ, मासोदा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती या संस्थेला हस्तांतरीत करुन मौजे कारंजा लाड, जि.वाशिम येथे स्थलांतरीत करण्यास पुढील अटींच्या अधिन राहून या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

<u>अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत</u> :-

१) सदरहू संस्थेने शाळा अपंग व्यक्ती (समान संधी हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील तरतूदीनुसार मौजे कारंजा लाड, जि.वाशिक येथे सुरु करावी.

२) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी सदरहू संस्थेची शाळा सुरु झाल्यानंतर तपासणी करुन संबंधीत संस्था अपंग व्यक्ती (समान संधी हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील तरतूदीनुसार अनुज्ञप्ती देण्यास पात्र असल्याचे खात्री करुन अनुज्ञप्ती द्यावी.

३) शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या अटी व शर्तींची सदरहू संस्थेस पूर्तता करणे बंधनकारक राहील.

४) वरीलप्रमाणे शासनाच्या आदेशाचे आणि अटी व शर्तीचे पालन न केल्यास संबंधीत सस्थेस हस्तांतरण करुन स्थलांतर करण्यास दिलेली शाळेची मान्यता रद्द करण्यात येईल.

५) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे तथा सक्षम प्राधिकारी यांनी अपंग व्यक्ती (समान संधी हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील तरतूदीनुसारतसेच अपंग शाळा १९९७ च्या संहितेनुसार आणि शासनाचे वेळोवेळी काढलेल्या स्थायी आदेशानुसार व मा.न्यायालयाचे काही आदेश /निर्णय असल्यास ते लक्षात घेऊन संस्थेस हस्तांतर व स्थलांतर करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

६) या प्रकरणी हस्तांतर व स्थलांतर करण्यास काही अडचणी उद्भवल्यास वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास तात्काळ करावा.

७) दिपस्तंभ डॉ.बाबासाहेब आंबेडकर महिला शैक्षणिक संस्था, यवतमाळ संचलीत मातोश्री पार्वतीबाई निवासी अंध विद्यालय, भोसा, जि.यवतमाळ या शाळेतील प्रशासकीय मान्यता प्राप्त कर्मचा-यांना नवीन संस्थेत प्राथम्याने सामावून घेण्यात यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचे संकेतांक २०१६०११५११४८१२०८२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pratap P Lubal

Digitally signed by Pratap P Lubal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Pratap P Lubal
Date: 2016.01.15 11:49:22 +05'30'

(प्र. पां. लुबाळ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति

१) मा.मंत्री (सा.न्या.) यांचे खाजगी सचिव.
२) प्रधान सचिव, सा.न्या.व वि.स.विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३) आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
४) प्रादेशिक उप आयुक्त समाज कल्याण विभाग, अमरावती
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ/वाशिम
६) समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ/वाशिम
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा) महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर

८) जिल्हा कोषागार अधिकारी, वाशिम.

९) अध्यक्ष, दिपस्तंभ डॉ.बाबासाहेब आंबेडकर महिला शैक्षणिक संस्था, यवतमाळ.

१०) अध्यक्ष/सचिव, श्री.राष्ट्रसंत शिक्षण संस्कृती ज्ञानपीठ, मासोदा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

११) निवडनस्ती, अपंग कल्याण-१.

******